जनपत्र

शुक्रवार, दि. २० मार्च २०१५

बालकामगार शाळेतील विद्यार्थ्यांनी सहलीत लुटला मनसोक्त आनंद

औरंगाबाद (प्रतिनिधी) : आझाद अली शाह शिक्षण संस्थेद्वारे मिस्बाह कॉलनी किराडपुरा येथे व निर्मल कॉलनी पेठे नगर येथे सुरु असलेल्या बालकामगार विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल काढण्यात आली.

दि. १८ मार्च रोजी या दोन्ही बालकामगार शाळांची शैक्षणिक सहल सिध्दार्थ उद्यानात आली होती. या सहलीसाठी लागणारा सर्व खर्च संस्थेच्या अध्यक्षा खान सुरैय्या व संस्थेचे प्रशासकीय अधिकारी साजीद खान यांनी करून या बालकामगार शिक्षणापासून दूर असलेल्या पालकांच्या पाल्यांना एक दिवस आनंद उत्साह आणि खुशहालीत घालवण्याची संधी मिळवून दिली. या मुलांसाठी [illegible] बसची सुविधा करून सिध्दार्थ उद्यानातच पोटभर जेवणाची मेजवानीही संस्थेने आपल्यावतीने दिली. सहलीत आनंद लुटल्यानंतर एक-एक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अनेकांचे बोलता-बोलता डोळे भरून आले. प्रत्येकाने आपल्या भाषणात संस्थेच्या अध्यक्षा व संस्थेचे प्रशासकीय अधिकारी यांचे मनापासून आभार व्यक्त केले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष शिक्षण उपसंचालक कार्यालयातील नियुक्त प्रशासकीय अधिकारी बाहउद्दीन सिद्दीकी हे होते प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेचे नियुक्त शिक्षण विस्तार अधिकारी [illegible] हे होते. मुलांच्या आनंदात भर घालण्यासाठी आलेले संस्थेचे अध्यक्षा खान सुरैय्या व संस्थेचे प्रशासकीय अधिकारी खान साजीद हे उपस्थित होते. सूत्रसंचलन खान आयशा यांनी केले तर माया यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सय्यद नसरीन, सय्यद जीनत, मिना भालेराव, शेख तौहीद, मोहंमद इसरार, शेख [illegible], आशा साळवे यांनी परिश्रम घेतले.

दैनिक औरंगाबाद

स्वतंत्र विचाराचे निर्भीड, नि:पक्ष, दर्जेदार दैनिक

विश्व मित्र

शुक्रवार दि. २० मार्च २०१५

बालकामगार शाळेतील विद्यार्थ्यांनी सहलीत लुटला मनसोक्त आनंद

औरंगाबाद – प्रतिनिधी

आझाद अली शाह शिक्षण संस्थेद्वारे मिस्बाह कॉलनी किराडपुरा येथे व निर्मल कॉलनी पेठे नगर येथे सुरु असलेल्या बालकामगार विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल काढण्यात आली. दि. १८ मार्च रोजी या दोन्ही बालकामगार शाळांची शैक्षणिक सहल सिध्दार्थ उद्यानात आणण्यात आली. या सहलीसाठी लागणारा सर्व खर्च संस्थेच्या अध्यक्षा खान सुरैय्या व संस्थेचे प्रशासकीय अधिकारी साजिद खान यांनी करून या बालकामगार शिक्षणापासून हजार हात दूर असलेल्या पालकांच्या पाल्यांना एक दिवस आनंद उत्साह आणि खुशहालीत घालविण्याची संधी मिळवून दिली. या मुलांसाठी [illegible] बसची सुविधा करून सिध्दार्थ उद्यानातच पोटभर जेवणाची मेजवानीही संस्थेने आपल्या वतीने दिली.

सहलीत आनंद लुटल्यानंतर एक एक विद्यार्थ्याने आपले मनोगत व्यक्त केले व अनेकांचे बोलता बोलता डोळे भरून आले. प्रत्येकाने आपल्या भाषणात संस्थेच्या अध्यक्षा व संस्थेचे प्रशासकीय अधिकारी यांचे मनापासून आभार व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाचे नियुक्त प्रशासकीय अधिकारी बाहउद्दीन सिद्दीकी हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेचे नियुक्त ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी [illegible] हे होते. मुलांच्या आनंदात भर घालण्यासाठी आलेले संस्थेच्या अध्यक्षा खान सुरैय्या व संस्थेचे प्रशासकीय अधिकारी खान साजिद हे उपस्थित होते.

संस्थेचे प्रशासकीय अधिकारी खान साजिद यांनी आपल्या भाषणात आम्ही सर्वतोपरी आपल्या मदत करण्यास तयार आहोत. तुम्ही फक्त चांगले शिक्षण आणि शिक्षणापासून आपली आणि आपल्या परिवाराची व संपूर्ण देशाच्या प्रगतीला हातभार लावा. कार्यक्रमाचे अध्यक्ष यांनी आपल्या भाषणातून स्वतःचे उदाहरण देऊन विद्यार्थ्यांना हा संदेश दिला की, प्रयत्न करत रहा. यश निश्चित तुमच्या पदरात पडेल, तुम्ही फक्त प्रयत्न करत रहा. बाकी सर्व तुमची संस्था सांभाळण्यास तयार आहे. ही संस्था तुमच्या [illegible] तुमच्या पाठीमागे उभे आहेत [illegible]. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन खान आयशा यांनी केले तर आभार प्रदर्शन माया आव्हाड यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सय्यद नसरीन, सय्यद जिनत, मिना भालेराव, शेख तौहीद, मोहम्मद इसरार, शेख [illegible], आशा साळवे, शेख [illegible] यांनी प्रयत्न करून जेवणानंतर सहलीची सांगता करण्यात आली.